22 JUL 2022 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाची योजना : ८६५ मराठी भाषिक गावांतील विद्यार्थ्यांना होणार लाभ

# सीमाभागातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण !

**राम मगदूम**

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज :** सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र-कर्नाटक या राज्यांच्या सीमाप्रदेशातील मराठी भाषिक विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याचा क्रांतिकारी निर्णय शिवाजी विद्यापीठाने हीरकमहोत्सवी वर्षात घेतला आहे. सीमाभागातील तब्बल ८६५ गावांतील विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होणार आहे.

या योजनेतील प्रवेश प्रक्रियेची माहिती देण्यासाठी बेळगाव व बिदर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी २६ जुलै ते ४ ऑगस्टअखेर सकाळी ११ वाजता खास मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.



**प्रवेश मार्गदर्शनाचे वेळापत्रक ठिकाण व स्थळ**

- **२६ जुलै :** बेळगाव - संत तुकाराम महाराज सांस्कृतिक भवन खानापूर रोड.
- **२८ जुलै :** भालकी - छत्रपती शिवाजी महाराज कॉलेज.
- **४ ऑगस्ट :** निपाणी - देवचंद महाविद्यालय.

## चंदगडमधील शिनोळीत कौशल्य विकास केंद्र

सीमाभागातील मराठी विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण देण्यासाठी विद्यापीठाने चंदगड तालुक्यातील शिनोळी येथे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र सुरु केले आहे. त्याठिकाणी सध्या काजू प्रक्रिया व मार्केटिंग हा अभ्यासक्रम सुरु आहे. परिसरातील विद्यार्थ्यांची गरज ओळखून कृषिपूरक नवनवे अभ्यासक्रम सुरु करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

शिवाजी विद्यापीठातील दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मोफत/सवलतीत घेऊन भविष्य घडविण्याची संधी सीमाभागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध झाली आहे. या क्रांतिकारी निर्णयाबद्दल कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के व सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन.

- **राजेश पाटील**, आमदार

१९५६ पासून सीमाप्रश्नाचे भिजत घोंगडे कायम आहे. दरम्यान, कर्नाटक सरकारकडून सीमाभागातील मराठी भाषिकांवर अन्यायाच्या घटना वेळोवेळी घडतात. या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्याच्या अमृतहोत्सवी वर्षात शिवाजी विद्यापीठाने घेतलेला हा निर्णय कौतुकास्पद आहे. या योजनेत संबंधित विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाच्या परिसरातील सर्व अनुदानित अभ्यासक्रमांचे शैक्षणिक शुल्क आणि वसतिगृहाचे शुल्क माफ करण्यात येणार आहे. विनाअनुदानित अभ्यासक्रमांच्या शुल्कात २५ टक्के सवलत दिली जाणार आहे.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात ॲथलेटिक्स स्पर्धा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सिंथॅटिक्स ट्रॅकवर ॲथलेटिक्स असोसिएशनतर्फे आज, शुक्रवारपासून कनिष्ठ जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धा रंगणार आहे. त्यासाठी सुमारे एक हजार खेळाडूंनी नोंदणी केली आहे. यातून जिल्हा संघाची निवड होणार आहे. यावर्षी १४, १६, १८ आणि २० वयोगटातील ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी जिल्हा संघ निवडण्याकरिता असोसिएशनतर्फे शुक्रवार ते रविवारपर्यंत सकाळी ९ ते सायं. ६ यावेळेत स्पर्धा होणार आहे.

पुढारी

# विद्यापीठस्तरीय परीक्षेला १४,८२६ विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्राच्या विद्यापीठस्तरावरील २७ विषयांच्या परीक्षा गुरुवारी झाल्या. १४ हजार ८२६ विद्यार्थी परीक्षेला बसले. विद्यापीठ परीक्षा विभागातर्फे सर्व ७४१ परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पद्धतीने घेतल्या जाणार आहेत.

१९ जुलैपासून २७६ महाविद्यालयांत पहिल्या टप्प्यातील अभ्यासक्रम परीक्षा सुरू झाल्या आहेत. बीएस्सी (कॉम्प्युटर सायन्स, बायो-टेक, फूड सायन्स अँड टेक., शुगर टेक, इन्व्हायर्मेंटल सायन्स, आयटी), बी.कॉम. (आयटी, बिझनेस मॅनेजमेंट), बी.व्होक (टुरिझम अँड सर्व्हीस इंडस्ट्री, ऑटोमोबाईल, मिडिया अँड मॅनेजमेंट, सस्टीनेबल ॲग्रीकल्चर), पीजी डिप्लोमा इन टुरिझम अँड ट्रॅव्हलिंग, एम.ए. (संगीत), एम.ए.,एमपीए (ड्रामॅटिक्स), बीए (मल्टिमिडिया) आदी २७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा गुरुवारी झाल्या.

सकाळ

# सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठात मोफत प्रवेश

## कुलसचिव डॉ. शिंदे; सवलतींचाही लाभ घ्या

**सकाळ वृत्तसेवा**

बेळगाव, ता. २१ : महाराष्ट्राने दावा केलेल्या कर्नाटकातील सीमाभागातील ८६५ गावांमधील विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाकडून सर्व अभ्यासक्रमांसाठी मोफत, तसेच सवलतीच्या दरात प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी ही प्रवेश प्रक्रिया असणार आहे. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी याबाबतची घोषणा केली आहे.

या प्रवेशाबाबतची माहिती तसेच मार्गदर्शनासाठी बेळगावात २६ जुलै रोजी सकाळी अकरा वाजता तर निपाणीत ४ ऑगस्टला कार्यक्रम होईल. बिदर जिल्ह्यातील भालकी येथील विद्यार्थ्यांसाठी २८ जुलै रोजी हा कार्यक्रम आहे. शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रम किंवा या योजनेसाठीच्या अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांना विद्यापाठीच्या http://www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर भेट देण्याचे आवाहन केले आहे.

**विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी**

सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी चंदगड तालुक्यात शिनोळी येथे महाविद्यालय सुरू केले जाणार आहे. निपाणी भागातील विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षणासाठी महाराष्ट्रात जाण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाने अशा विद्यार्थ्यांसाठी ही नवी योजना सुरू केली आहे. या योजनेचा लाभ सीमाभागातील हजारो विद्यार्थ्यांना मिळू शकतो. बेळगाव, कारवार, बिदर व गुलबर्गा या कर्नाटकातील चार जिल्ह्यांमधील ही ८६५ गावे आहेत.

तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च –एप्रिल उन्हाळी ऑफलाईन वस्तुनिष्ठ परीक्षा दोन दिवसांपासून सुरू आहेत. ५६१ परीक्षांपैकी २७ विषयांच्या ७८ परीक्षा पार पडल्या असून १४८२३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.जाधव यांनी दिली.